॥ श्री ॥

॥ बाबा ॥

# प्रदक्षिणा

घालू प्रदक्षिणा, प्रदक्षिणा गजानन बाबांना
चित्ती धरूया, स्मरूया त्यांच्या चरणद्वयांना ॥

प्रदक्षिणा घालता घालता सांडो देहभान
वृत्ती ठेवूया, ठेवू या त्याचेवर रात्रंदिन ॥1॥

प्रदक्षिणा घालता घालता तुटो प्रपंचबंधन
प्रेम वाढो दे, वाढो दे परमार्थी ते निशिदीन ॥2॥

ऐशी प्रदक्षिणा घालता चुको जन्ममरण
बाबांचरणी, चरणी अंत व्हावी मिलन ॥3॥

★★★★★